# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०६/०३/२०१८**

## १) विनयभंग_ :-

**अ) नांदेड ग्रामीण :-** दिनांक ०३.०३.२०१८ रोजी चे ११.३० वा. चे सुमारास फिर्यादीचे घरात गोपाळचावडी नांदेड येथे यातील फिर्यादी महीला ही फरशी पुसत असताना घरी एकटी असल्याचे पाहुन यातील आरोपीने फिर्यादीचे घरात प्रवेश करुन तिस अश्लील भाषेत बोलुन विनयभंग केला वगैरे **२० वर्षीय फिर्यादी महीलेने** दिलेल्या फिर्यादवरुन **पो. स्टे. नांदेड ग्रामीण** गुरनं ९३/२०१८ कलम ३५४, ४५२, भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास मपोउपनि/ कावळे मॅडम मो.क्र. ९६७३९३५९७४** हे करीत आहेत.

**ब) लिंबगाव :-** दिनांक ०४.०३.२०१८ रोजी चे २२.०० वा. चे सुमारास मौजे पुयनी नांदेड येथे यातील फिर्यादी महीला ही शौचालयास बाहेर गेली असता यातील नमुद आरोपीने तिचा हात पकडुन तिच्याशी जवळीक करण्याचा प्रयत्न करुन विनयभंग केला. घडलेला प्रकार तिने तिचे पतीस सांगीतले असता तिच्या पतीने आरोपीला जाब विचारला असता आरोपीने तिच्या पतीस जिवे मारण्याची धमकी दिली वगैरे **२० वर्षीय फिर्यादी महीलेने** दिलेल्या फिर्यादवरुन **पो. स्टे. लिंबगाव** गुरनं ०८/२०१८ कलम ३५४, ५०६, भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/ बोनवाड मो.क्र. ९८२०९७८९५९** हे करीत आहेत .

## २) बेकायदेशिररीत्या शिंदी दारू बाळगुन मिळुन आला :-

**वजिराबाद :-** दिनांक ०५.०३.२०१८ रोजी चे १८.१५ वा. चे सुमारास उस्मानशाही शाळेच्या पाठीमागे नांदेड येथे यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या शिंदी १३० लीटर किंमती ५,२००/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोउपनि/ किरण सुरेश पठारे ने. पो. स्टे. वजीराबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. वजिराबाद** गुरन ३८/२०१८ कलम ६५ (ई), ८३ महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/७२२ यु. के. दामेकर मो.क्र. ८३०८७७८७७७** हे करीत आहेत.

## ३) विदयुत शॉक लागुन आकस्मात मृत्यु :-

**भोकर :-** दिनांक ०५.०३.२०१८ रोजी चे सकाळी ०४.०० वा. चे सुमारास बोरवाडी शिवार ता. भोकर जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे रावसाहेब मारोती सरकुंडे वय ४५ वर्षे व्यवसाय शेती रा. समंदरवाडी ता. भोकर जि. नांदेड** हा ज्वारीचे पिकाला पाणी देण्यासाठी खांदयावर पाईप घेवुन जात असताना पोलवरील विद्युत वायर त्याचे मानेवर पडल्याने शॉक लागल्याने जागीच मरण पावला. वगैरे **खबर देणार नामदेव मारोती सरकुंडे वय ५५ वर्षे व्यवसाय शेती रा. समंदरवाडी ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भोकर** आ.मृ. ११/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोना/ १९५९ व्यवहारे मो.क्र. ९६०४३३३२५६** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४